# लोकशाही झुकविणारी समाजमाध्यमे

---मानसी मोकाशी

काही दिवसांपूर्वी केंब्रिज ॲनालिटिका या नावाची काही कंपनी आहे याचीही माहिती नसलेले आपण आज फेसबुक, डाटा चोरी, व्यक्तीचा खाजगीपणाचा अधिकार वगैरे बाबत या कंपनीच्या संदर्भात जोरदार चर्चा करतो. समाजमाध्यमांवर मतप्रदर्शन करणं योग्य की अयोग्य यावर सर्वत्रच चर्चा घडत आहेत. कारण ज्या फेसबुकबद्दल आणि त्याचा संस्थापक मार्क झुकेरबर्ग याच्याबद्दल आपण प्रेमानं बोलत होतो, त्याच्या संपत्तीच्या निर्मितीक्षमतेकडे आ वासून पाहात होतो, त्याची जागा आता संशयानं घेतली आहे. २०२० साली होणाऱ्या निवडणुकीत मार्क झुकरबर्ग अमेरिकेच्या अध्यक्षपदाचे दावेदार असेल असंही म्हटलं जात होतं! तोच झुकेरबर्ग आता आरोपीच्या पिंजऱ्यात उभा असल्याचं चित्र जग पाहात आहे!!

फेसबुकचे जगभरात जवळपास २१० कोटी वापरकर्ते आहेत. घोटाळ्याच्या बातमीनंतर फेसबुकचे १० कोटी वापरकर्ते त्यांचा वापर बंद करण्यास तयार झाले. काहींनी त्यांचे अकाउंट डिलीट केले, तर काहींनी फेसबुकचा ॲप डिलीट केला. या कंपनीच्या समभागांचा भाव एकदम १० ते १४ टक्क्यांनी घसरला. त्यामुळे कंपनीचं ४ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं.

लोकशाहीतील अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा बरावाईट उपयोग करण्याचा मुक्त परवाना देणाऱ्या समाजमाध्यमांकडे समाज सहजपणे ओढला गेला. आपण तंत्रस्नेही आहोत याचा अभिमान आणि त्यासाठी स्मार्टफोनसारख्या साधनांची सहज उपलब्धता यामुळे फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर आणि इतरही काही माध्यमांनी त्याला भुरळ घातली. कशाला हवेत संपादक आणि प्रकाशक असे म्हणून त्या माध्यमांवर आपली मतं मांडली जाऊ लागली. त्या गदारोळात आणि त्यासाठी खर्च होणाऱ्या वेळात विशेषतः तरुण पिढीला जगाचा विसर पडू लागला. या वातावरणात फेसबुक या समाजमाध्यमाचा बुरखा फाडला गेला आणि जणू काही भूकंप झाला. संगणकातील कुठलंही ॲप डाऊनलोड करताना आपल्याला आपली वैयक्तिक माहिती द्यावी लागते हा अनुभव

आपल्यालाही आला असेल. तुमच्याजवळ इंटरनेट असलं की पुरे, तुम्ही जगभरात कुठेही कुणाशीही तेही फुकट बोलू शकता, त्यांना आपला संदेश पाठवू शकता याची भुरळ जगभरातील जनतेला पडली आणि मग त्यातूनच या खेळाची सुरुवात झाली.

जगात काहीही फुकट नसतं हा  साधा हिशोब त्यामागे आहे. फेसबुक किंवा गूगल, यू ट्यूब किंवा इतर कोणतेही ॲप घ्या, त्याच्या वापरासाठी आपण जर पैसे मोजत नसलो, तरी ते चालते कसे, किंवा तरीही त्या कंपनीच्या समभागांना कोट्यवधींची किंमत कशी येते याचा विचार आपण सोयिस्करपणे करत नाही. आपण त्या कंपनीला पुरवलेली माहिती आणि आपल्या संदेशांतून आपण आपल्या व्यवहारांची आपल्या नकळत त्यांना पुरवलेली माहिती यांचं रीतसर संकलन आणि विश्लेषण केलं जातं. त्यातून आपली आभासी प्रतिमा तयार केली जाते आणि आपल्या आवडीप्रमाणे जाहिरातींचा मारा आपल्यावर होतो. त्याचं आपल्याला कौतुक वाटतं. पण त्या जाहिरातींतून त्या कंपनीला पैसे मिळत असतात. याची पुढची पायरी म्हणजे आपल्या माहितीचा साठा इतर कंपन्यांना पुरवला जातो. त्यातून प्रचंड पैसा मिळतो.

कंपन्या ही माहिती कशाकरिता वापरतात?  त्यांच्या उत्पादनाला कुठे, कसा उठाव असू शकेल, उत्पादनाच्या विक्रीसाठी काय केलं पाहिजे यासंबंधी मार्गदर्शनच त्यांना या पाहणीतून मिळतं. हे वस्तूंसंबंधात जसं खरं आहे, त्याचप्रमाणे राजकीय संदर्भातही खरं आहे. त्यामुळेच फेसबुकच्या गैरवापराचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दावोस येथे जानेवारी महिन्यांत झालेल्या वसुंधरा परिषदेत याबाबत शंका व्यक्त केली गेली होती. केंब्रिज ॲनालिटीकामध्ये संशोधन संचालक म्हणून काम केलेल्या क्रिस्तोफर वायली यांनी त्यावर शिक्कामोर्तब केले.

या दशकातील काही सत्तांतरं तेथील जनतेनं समाजमाध्यमांच्या वापरातून घडवून आणली अशी चर्चा होती. पण या समाजमाध्यमांद्वारे तेथील चळवळींना चालना आणि दिशा मिळाली असं म्हटलं गेलं होतं. तेथील सत्तांतराचा या कंपन्यांशी थेट संबंध तेव्हा तरी जोडला गेला नव्हता. या कंपन्या लोकांची मतं घडवतात आणि मानसिक परिवर्तन त्यांच्या माध्यमांतून घडवलं जातं असं गेल्या काही वर्षांत लक्षात येऊ लागलं होतं. अमेरिकी अध्यक्षांच्या निवडणुकीत हिलरी यांचं पारडं जड आहे असं शेवटपर्यंत बोललं गेलं ; पण तेव्हापर्यंत विजयाच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या हिलरी क्लिंटन यांच्या खाजगी ईमेल प्रकरणाचा उल्लेख

एफ बी आयचे तत्कालीन अध्यक्ष जेम्स कॉमी यांनी केला आणि याचा फायदा शेवटच्या काही तासांत केंब्रिज ॲनालिटिकानं करून घेऊन लोकांचं मत डोनाल्ड ट्रंप यांच्या बाजूला वळवलं. विजय  डोनाल्ड ट्रंप यांचाच झाला. ट्रंप यांचे माजी सहकारी स्टीव्ह बेनन आणि केंब्रिज ॲनालिटीकाचे मुख्याधिकारी अलेक्झांडर निक्स यांची भेट २०१३ साली झाली. रिपब्लिकन खासदार रॉबर्ट मर्सर यांनी या कंपनीमध्ये पैसा गुंतवला होता. स्टीव्ह बेनन यांच्या इशाऱ्यावर १० लाख डॉलर देऊन फेसबुककडून वैयक्तिक माहितीचा महागठ्ठा घेण्यात आला. त्याचा वापर या निवडणुकीत करण्यात आला.

याबाबत एक वाचकपत्र वाचण्यात आलं. त्यात लेखकानं म्हटलं होतं, मला जर फेसबुक, व्हॉट्स ॲप, यू ट्यूब वगैरे चॅनल फुकट वापरायला मिळत असतील तर मी ती वापरायला काय हरकत आहे? ते भले आमचं मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत असतील, पण मी माझ्या मतावर ठाम असल्यावर अशा प्रयत्नांची पर्वा करण्याचं कारण काय? मुद्दा विचार करण्यासारखा आहे. पण हेही खरं की जर मतदार त्यांच्या मतांवर ठाम असतील तर मग निवडणूक प्रचाराची तरी आवश्यकता काय? पण असा प्रचार केला जातो. त्या प्रचाराचा परिणाम लोकांवर होतो.

मानवी उत्क्रांतीच्या काळात मानव टोळ्यांनी राहात होता. त्यात त्याला सुरक्षितता वाटत होती. त्या टोळीतील आक्रमक माणूस त्यांचा सरदार होत होता.  पण प्रगत समाजात राजकीय व्यवस्था स्थिर झाली तरी आक्रमकता गेली नाही. त्या आक्रमकतेतून दुसऱ्यांमध्ये निर्माण होणारी भीतीची भावना असते त्या भावनेचा राजकारणी लोक उपयोग करून घेतात. त्या भीतीतून बाहेर पडण्यासाठी राजकारणी आपल्याला मदत करू शकतात हा विश्वास निवडणुका जिंकण्यासाठी कामी येऊ शकतो. ऐतिहासिक काळात शस्त्रांची लढाई होत होती. आता शस्त्रांनी लढाई होत नाही असं नाही, पण ती अधिकतर मानसिक पातळीवरच होते. प्रचार म्हणजे तरी काय? उद्याच्या काळजीतून आपल्याला हा नेता वाचवू शकतो हा विश्वास. त्यामुळे निवडणुकीच्या आधी केलेल्या खेळीचा अमेरिकी जनमानसावर परिणाम झाला आणि ट्रंप निवडून आले. ३२ कोटी लोकसंख्येच्या अमेरिकेत जेव्हा पाहणीतून ५ कोटी लोकांची एकगठ्ठा माहिती फेसबुककडे आली, तेव्हा त्यांना माहितीचा खजिनाच मिळाला होता. त्याचा त्यांनी पद्धतशीर वापर केला.

फेसबुकवर काय नसतं? आपल्या फेसबुकपेजवर लोक आपण काय खातो पितो, कुठे जातो, काय करतो इथपासून सगळी माहिती देतात. आपली राजकीय मतंही मांडतात. त्यामुळे तर आजकाल नोकरीसाठी मुलाखतीला बोलविल्या जाणाऱ्या उमेदवाराची मुलाखत घेण्यापूर्वी त्याचं फेसबुक पेज पाहिलं जातं. केंब्रिज ॲनालिटिकानं अशी माहिती मिळवली, त्याचप्रमाणे निवडणुकीतही आपल्याला हवी ती माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचं काम फेसबुकच्या माध्यमातून केलं. केवळ अमेरिकी निवडणुकीतच अशा प्रकारचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाला असं नाही, तर युरोपियन युनियनमधून ब्रिटननं बाहेर पडावं की नाही या प्रश्नावर जेव्हा सार्वमत घेण्यात आलं तेव्हाही हाच प्रयोग झाला असे पुरावे आहेत. अशा प्रकारे प्रभाव टाकला गेला नसता, तर बहुतेक ब्रिटन युरोपियन युनियनमधून बाहेर पडला नसता असं म्हटलं जातं. युरोपियन युनियनमधून बाहेर पडा असं म्हणणारे ५१ टक्के तर बाहेर पडू नये असं म्हणणारे ४९ टक्के असं घासाघाशीचं हे युद्ध होतं. मतदान आहे, लोकशाही प्रक्रियाही आहे, पण तिच्यावर मानसशास्त्रीय दबाव आहे असं हे प्रकरण निघालं.

आपल्या देशात स्मार्ट फोन वापरणाऱ्यांची संख्या मोठी आहे. १.२१दशलक्ष लोकांकडे मोबाईल फोन आहेत. ५०० दशलक्ष लोक इंटरनेटचा वापर करतात. त्यामुळे आपल्याकडे केंब्रिज ॲनालिटिका कंपनीसारख्या उपद्व्यापी कंपनीचं फावलं नाही तरच नवल. राजकारण आपल्या रक्तात भिनलेलं असल्याप्रमाणे आपण त्यावर चर्चा करतो. आपली राजकारणावरील मतं या समाजमाध्यमांवर जाहीर असतात. त्यामुळे आपण अशा प्रकारांपासून सावध राहण्याची गरज आहे.कुठलीही गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली की खरी वाटते हा मानसशास्त्रीय सिद्धांत आहे. त्यामुळे खोट्या, सांगोवांगीच्या गोष्टींवरही तंत्रस्नेही असण्याच्या नावाखाली आपण विश्वास ठेवतो. माहितीच्या माऱ्याखाली आपली मतं बदलू शकतात आणि लोकशाहीच्या बुरख्याखाली अनेक प्रकारच्या मखलाश्या होऊ शकतात हे या प्रकारानं दाखवून दिलं आहे.

आपला मेंदू विचार करतो तेव्हा निवडक गोष्टीच विचारात घेतो. अपेक्षित गोष्टींपेक्षा वेगळं काही असेल तर त्याचा विचार करत नाही हे प्रयोगांतून सिद्ध झालं आहे. अर्लिक निसर या मानसशास्त्रज्ञानं यू ट्यूबवर टाकलेली अदृष्य गोरिला हा व्हिडियो पाहिला की कळेल, यात पांढरे आणि काळे कपडे घातलेले स्त्री पुरुष बास्केट बॉल खेळताना दाखविले होते. ते पळत, चालत

चेंडू एकमेकांकडे पास करतात. त्यातील पांढरे कपडे घातलेले लोक किती वेळा चेंडू पास करतात ते मोजण्यास सांगितले होते. त्याच व्हिडिओत एक गोरिला येतो, तो छाती बडवून निघून जातो, पण पांढरे कपडे घातलेले लोक किती वेळा चेंडू टाकतात ते मोजताना तो गोरिला निरीक्षकांना दिसलाही नाही. डोळ्यादेखत घडणारी गोष्ट आपल्या लक्षात येत नाही हे अशक्य वाटणारं पण सत्य आहे.

ट्विटरवर बॉट नावाचं एक अकाउंट आहे. त्यात एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचं ट्विट रिट्विट व्हायचे. शेकडो संगणकांतून ते प्रसारित व्हायचे. त्याचवेळी ते मूळ ट्विट ज्या अकाउंटवरून केले जायचे तेच गायब व्हायचे. ट्रंप यांच्या निवडणुकीच्या वेळी अशी अनेक अकाउंट युक्रेनमधून निर्माण झाली असं सिद्ध झालं. फेसबुकवरच्या अनेक जाहिरातींचे पैसे रशियन चलनात दिले गेले असंही फेसबुकनं कबूल केलं आहे. राहुल गांधी सध्या बॉटचा उपयोग करतात असाही आरोप आहे. फेसबुकचा गुन्हा जोपर्यंत सिद्ध होत नाही तोपर्यंत भारत या कंपन्यांशी संबंध सोडणार नाही असं केंद्रिय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे. डिजिटल इंडियाच्या नावाखाली भारत या कंपन्यांशी जोडला गेला आहे, तरी त्यामुळे सावधानता मात्र आवश्यक आहे.

---------------------------------